बृहन्मुंबई महानगरपालिका

उप आयुक्त (सामान्य प्रशासन विभाग)

⇩

उप प्रमुख लेखापाल (आस्थापना-एक)

माहिती पुस्तिका

केंद्र सरकारचा माहितीचा अधिकार अधिनियम, 2005

## <u>सार्वजनिक सूचना</u>

केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 मधील कलम 4(1)(ब) नुसार याद्वारे असे अधिसूचित करण्यात येते की, कलम 4(1)(ब)(एक) ते (सतरा) मध्ये नमूद केल्याप्रमाणे खालील माहिती, माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 अन्वये नागरिकांना सामान्यपणे मिळण्याच्या उद्देशाने नागरिकांच्या माहितीसाठी प्रसिध्द करण्यात आली आहे.

श्रीमती अर्चना चा. ठोके
उप प्रमुख लेखापाल (आस्था.1)
सार्वजनिक माहिती अधिकारी

संबंधित खाते/विभागाची मोहोर

# माहितीचा अधिकार अधिनियम , 2005

सदर अधिनियमामध्ये सार्वजनिक प्राधिकरणाच्या नियंत्रणामधील माहिती जनतेला मिळण्याकरिता अधिकाराची प्रत्यक्षात कार्यवाही करण्यासाठी, प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणाच्या कामकाजामधील पारदर्शकता आणि उत्तरदायित्व (जबाबदारी) यांच्यामध्ये वाढ करण्यासाठी, केंद्रिय माहिती आयोग व राज्य माहिती आयोग यांची स्थापना करण्यासाठी तसेच त्यांच्याशी संबंधित किंवा आनुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्यात आलेली आहे.

ज्याअर्थी भारताच्या संविधानाने लोकशाही प्रजासत्ताकाची स्थापना केली आहे.

आणि त्याअर्थी लोकशाही कार्यरत राहण्यासाठी आणि भ्रष्टाचाराच्या निर्मूलनासाठी देखील तसेच सरकार आणि त्याची साहयीभूत अंगे शासनास उत्तरदायी (जबाबदार) राहण्याकरिता मूलभूत स्वरुपाच्या असणा-या माहितीने परिपूर्ण असणारे नागरिकत्व व माहितीची पारदर्शकता या घटकांची लोकशाहीला आवश्यकता आहे.

आणि ज्याअर्थी प्रत्यक्षात माहिती उघड करणे ही बाब, शासनाचे सक्षम प्रवर्तन, मर्यादित वित्तीय साधनस्त्रोतांचा इष्टतम विनियोग आणि संवेदनशील माहितीची गोपनीयता जतन करणे यांसह इतर हितांनाही बाधा पोहचविण्याची शक्यता असल्याने,

आणि ज्याअर्थी लोकशाहीचे सार्वभौमत्व जतन करीत असताना या हितांना बाधकरित्या परिणामकारक ठरणा-या बाबींमध्ये मेळ घालण्याची आवश्यकता आहे.

आणि म्हणून ज्या नागरिकांना माहिती मिळण्याची इच्छा आहे त्यांना ती पुरविणे इष्ट आहे.

या अधिनियमाअन्वये कोणतीही माहिती मिळविण्याची इच्छा असलेल्या व्यक्तीने इंग्रजी किंवा हिंदी भाषेत किंवा संबंधित क्षेत्राच्या अधिकृत भाषेत किंवा इलेक्ट्रॉनिक साधनांच्याद्वारे लेखी स्वरुपामध्ये, विहित करण्यात आलेल्या शुल्कांसह विनंती केली पाहिजे. माहिती मिळविण्यासाठी असा विनंती अर्ज मिळाल्यापासून 30 दिवसांच्या आत संबंधित माहिती पुरविण्यात येईल.

ज्या व्यक्तीला संबंधित विषयासंबंधी अधिक माहिती हवी असेल त्या व्यक्तीने या पुस्तिकेमध्ये नावे नमूद केलेल्या सार्वजनिक माहिती अधिका-यांशी संपर्क साधावा.

<u>कार्यालयाची रचना, कर्तव्ये आणि जबाबदा-या यांचा तपशिल</u>

उप प्रमुख लेखापाल (आस्था.1) यांच्या अधिपत्याखाली खालील उपविभाग कार्यरत आहेत.

1) रचना व कार्यपध्दती विभाग
2) आस्थापना अनुसूची विभाग
3) प्रमुख रुग्णालये आणि वैद्यकीय महाविद्यालयाचे आस्थापनाविषयक प्रस्ताव (एफईसी/ एफईएच विभाग)